॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (दि.०७) प्रतिनिधी : कला व शिक्षण मानवाचा अविभाज्य भाग असून कलेला पुरातन काळापासूनचा इतिहास आहे. शास्त्रीय नृत्यातून चांगले करिअर घडू शकते असे प्रतिपादन, शास्त्रीय नृत्याच्या ज्येष्ठ अभ्यासिका डॉ.सुचेता भिडे-चापेकर यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पीएमउषा अंतर्गत डिपार्टमेंट ऑफ परफॉर्मिंग आर्टस अॅन्ड फाईन आर्टस विभागातर्फे शास्त्रीय नृत्याचा गौरवशाली वारसा या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचा उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.व्ही.एल.माहेश्वरी तर प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, नितीन झाल्टे यांच्यासह परिषदेच्या संयोजक नेहा जोशी, कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ. राम भावसार उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ.सुचेता भिडे-चापेकर यांनी शास्त्री नृत्याची गौरवशाली परंपरा अधोरेखित करत कला ही जीवनाशी संबंधित असल्याचे सांगितले. नवीन शौक्षणिक धोरणात नृत्य कलांचा समावेश करण्यात आला असून प्रचार आणि प्रसारासाठी सुजाण नागरिकांची आवश्यकता आहे. दैनंदिन जीवनात नृत्यकला प्रकार निश्चितच उपयोगी ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे म्हणाले की, शास्त्रीय संगीत भारतीय ज्ञान परंपरेचा वारसा असून विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करणे गरजेचे आहे. शास्त्रीय संगीत कला ही भारताची सॉफ्टपॉवर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.व्ही.एल.माहेश्वरी म्हणाले की, कला म्हणजेच जीवनशौली असून शास्त्रीय नृत्याला अतिशय महत्वाचे स्थान आहे. शास्त्रीय नृत्य कला प्रकार जीवनशौलीला प्रतिबिंबित करत असल्यामुळे कला, भक्ती, अध्यात्म अणि जीवनशौली म्हणून त्याकडे बघतात असे स्पष्ट केले. वेगवेगळया कलाप्रकारांमुळे शहराची सांस्कृतिक शहर म्हणून ओळख होत आहे तसेच विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात दर्जेदार ओळख निर्माण केली असल्याचे मत प्रा.माहेश्वरी यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविकात सिनेट सदस्य तथा राष्ट्रीय परिषदेच्या संयोजक नेहा जोशी यांनी भूमिका मांडली. सूत्रसंचालन डॉ.प्रिती सोनी तर आभार डॉ. सुचित्रा लोंढे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राचार्य अनिल राव, प्रा.प्रकाश पाठक, अधिष्ठाता डॉ.अनिल डोंगरे, व्य.प. सदस्य डॉ.पवित्रा पाटील, राष्ट्रीय परिषदेचे समन्वयक स्वप्नाली काळे, अधिसभा सदस्य दिपक पाटील, अमोल मराठे, भानुदास येवलेकर, वैशाली वराडे, पीएमउषाचे प्रकल्प समन्वयक प्रा.आशुतोष पाटील, डॉ.राकेश रामटेके, डॉ.जयेंद्र लेकुरवाळे, डॉ.मधुलिका सोनवणे उपस्थित होते.

उद्घाटन सत्रानंतर नृत्यशास्त्र अभ्यासिका डॉ.स्वाती दैठणकर यांनी भरतनाट्यम या विषयावर मार्गदर्शन केले. तिस-या सत्रात डॉ.प्रितीलेखा चौधरी यांनी ओडीसी नृत्य प्रकाराबाबत मार्गदर्शन केले. प्रा.डॉ.जयंत शेवतेकर यांच्या अध्यक्षतेखाली संशोधक विद्यार्थ्यांनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले. चौथ्या सत्रात मुरलीमोहन कालवाकालवा यांनी विविध नृत्यांबाबत तर पाचव्या सत्रात डॉ.जयंत शेवतेकर यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय परिषदेचा समारोप पार पडला. यावेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ.विनोद पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.जयंत लेकुरवाळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.पवित्रा पाटील, प्रा.सुरेखा पालवे, राष्ट्रीय परिषदेच्या संयोजक नेहा जोशी उपस्थित होते. आभार कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ. राम भावसार यांनी मानले. राष्ट्रीय कार्यशाळेत १२० संशोधक विद्यार्थ्यांसह प्राध्यापक आणि कलावंत सहभागी झाले होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ७ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता